सुभाष सैनिकाची
जीवन–कथा

॥ निघालों, निघालों, निघालों रणा ॥
॥ अगे मातृभूमे तुझ्या रक्षणा ॥

★

: लेखक

भारत मित्र

किंमत दोन आणे

-प्रस्तावना-

हिंदी स्वातंत्र्यासाठीं सुभाषसेनेनें केलेला प्रयत्न अवर्णनीय आणि अतूलनीय असा आहे. राष्ट्राला अखंड स्फूर्ति देऊन, स्वातंत्र्याची ज्योत निरंतर तेवत ठेवणारा असा हा स्फूर्तिप्रद, विक्रमशाली व तेजस्वी अितिहास असून अशा अितिहासाचा ज्यांनी राष्ट्राला वारसा दिला त्यांची अुपेक्षा मग ती कोणाकडूनही होवो, तें राष्ट्रीय पाप आहे. राष्ट्रावर तो अेक कलंक आहे.

आज सुभाषसैनिकांची स्थिति, वादळांत सांपडून फुटलेल्या जहाजावरील प्रवासी, दैवामुळें किनाऱ्यावर निस्त्राण व गलित स्थितींत पडावेत, तशी आहे हिंदी सैन्यांत वीस वीस वर्षे नोकरी झालेल्या सुभाष सैनिकांना निवृत्तिवेतन मिळूं नये, रणांगणावर पडलेल्या सैनिकांच्या कौटुंबियांना मदत मिळूं नये आणि सैन्यांतील त्यांच्या पूर्वीच्या जागांवर त्यांना प्रवेश दिला जावू नये ही अन्यायाची परीसीमा आणि स्वातंत्र्यभक्तांचा अुघड अपमान आहे. अुपलब्ध पुराव्यांचें संशोधन करून व सुभाषसैनिकांच्या परिस्थितींचें निरीक्षण करुन श्री. भारतमित्र यांनी हा वृत्तांत लिहिला आहे अेवढें सांगितलें म्हणजे पुरे!

—गं. बा. परमेकर

★

चिफ् ऑफ् स्टाफ्

जनरल भोंसले

सुभाष सेनेचे कर्णधार जनरल जगन्नाथराव भोंसले यांनी सुभाष सैनिकांना न्याय मिळावा म्हणून अतिशय परिश्रम घेतले. सरकारनें हल्ली त्यांना निर्वासित खात्याचे डायरेक्टर जनरल नेमलें आहे. सुभाष-सैनिकांना आतां त्राता कोण आहे. ?

★

सुभाष सैनिकांची
जीवन-कथा

॥ जरी ध्यावयाचा पुन्हा जन्म झाला ॥
॥ तरी घअूं निःशंक ह्या भारती ॥

हिंदला स्वातंत्र्य मिळून आज ११॥ वर्षे होत आलें. या ११॥ वर्षाच्या स्वातंत्र्योत्तर अितिहासांत काळ्या अक्षरांनीं लिहिण्यासारखें जर कोणतें कार्य झालें असेल तर तें म्हणजें हिंदच्या स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या स्वातंत्र्य-वीर आझाद हिंद सेनीकांवर हिंद सरकारनें केलेला अन्याय होय. जगांतील अितर देशांतही स्वातंत्र्ययुद्धें झालेलीं आहेत. व ते देश स्वतंत्र होतांच या स्वातंत्र्य वीरांचा त्या त्या देशांनीं वीराला अुचित असा सन्मानहि केलेला आहे. पण जगाच्या व्यासपीठावरून लोकशाहीच्या अुदात्त तत्त्वांचा, नैतिक मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या या हिंद देशात आझाद हिंद सेनेच्या स्वातंत्र्ययोद्धयांवर जो अन्याय झाला, स्वतंत्र हिंदमध्यें त्यांची जी अुपेक्षा केली गेली त्या अन्यायाला व त्या अुपेक्षेला दुसऱ्या कुठच्याहि राष्ट्रांच्या अितिहासांत तोड नाहीं. आज या स्वातंत्र्यवीरांची स्वतंत्रतेच्या काळांत जी वाताहात झालेली आहे ती पाहिली कीं खरोखरच शरमेनें मान खालीं जाते. तहान, भूक, अुपासमार, मृत्यू– त्यांच्या दुर्दैवानें देअूं केलेल्या या देणग्यांवर समाधान मानून केवळ देश स्वतंत्र व्हावा, हिंदचा तिरंगी झेंडा लाल किल्ल्यावर रोंवून स्वातंत्र्याचा ललकार करावा या अेकाच आशा-वादानें प्रस्फुरित होअून हे वीर रणांगणावर लढले. त्यांचा तो प्रयत्न फसला असेल पण या त्यांच्या वीर्यशाली कार्यामुळें ब्रिटिश सत्तेखालीं राबणाऱ्या हिंदुस्थानच्या सैन्यांत जी राष्ट्रीय जागृति झाली व ज्या राष्ट्रीय जागृतिमुळें आरमारी बंडाचा प्रस्फोट झाला त्यामुळेंच हिंदुस्थान स्वतंत्र

झाला. महात्मा गांधींनीं हिंदुस्थानच्या जनतेंत स्वातंत्र्याची लालसा अुत्पन्न केली असेल पण जनता व परकीय लोकांच्या हुकमांत राबणारें स्वदेशी सैन्य यामध्यें जी परकेपणाच्या भावनेंची भिंत अुभारली गली होती ती फोडून टाकण्याचें, जमिनदोस्त करण्याचें महत्कार्य जर कोणी केले असेल तर तें आझाद हिंद सेनेनेंच.

देश स्वतंत्र झाल्यानंतर स्वतत्र देशाच्या सैन्यांत आझाद हिंद सैनिकांचा समावेश व्हावा यासाठीं ऑल अिण्डिआ आय्. अेन्. अे. अेक्वायरी ॲन्ड रिलिफ् कमिटीचे चेअरमन् या नात्यांनें ज. जगन्नाथराव भोंसले यांनी फार प्रयत्न केले. जनरल भोंसले यांनी सरकारकडे ज्या मागण्या सादर केल्या आहेत त्या अगदीं सामान्य स्वरूपाच्या आहेत. स्वदेशासाठीं लढणाऱ्या आझाद हिंद सैनिकांसाठीं करावयाच्या मागण्या यापेक्षां अधिक हव्या. १८ रुपये पगार घेवून पोटासाठी ब्रिटिशांची नोकरी करतां करतां धारातिर्थीं पडलेल्या सैनिकांना जे देण्यात येतें तेंच आझाद हिंद सैनिकांसाठीं जनरल भोंसले यांनी मागितलें आहे असें दिसते आणि अशा मागण्या धुडकाअून नेहरू सरकारनें अधिक कांही दिलें असतें तर जनता संतुष्टच झाली असती परंतु अशा दरिद्री मागण्या पुऱ्या न करण्याचे जें दारिद्र्य पंतप्रधानांनी दाखविलें आहे ते पाहुन आम्हाला त्यांची कींव येते.

(१) आझाद हिंद सैनिकांपैकीं जे लोक कामास आले, त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या त्यांच्या कौटुंबियांस पेन्शनीदाखल रक्कम देण्यांत यावी. (५३ अधिकारी २६४७ सैनिक धारातीर्थी पडले असून त्यांच्याकरतां द. म. ५०,००० खर्च सरकारला सोसावा लागेल. --लेखक)

(२) सैनिकांचा थकलेला पगार, भत्ता आणि पेन्शनहि देण्यांत यावींत. (याकरतां सरकारला अेक कोट रुपये खर्चावे लागतील —लेखक)

(३) आझाद हिंद सेनेतील ऑफिसर्स व अितर सैनिक (सुमारें ७००० माणसें) यांस सैन्यांत घेअून त्यांच्या हुद्याप्रमाणें जागा द्याव्यात. यांचा अुपयोग सरकार जीं नागरिकदलें स्थापून त्यांस लष्करी शिक्षण देण्याच्या योजना करीत आहे त्या योजना अमलांत आणण्यासाठीं करावा. (ऑफिसर्स ७०, व्हीं. सीं. ओ. २००, व अितर १३६६० मिळून १३९३०

आझाद हिंद सैनिक हिंदी संघराज्यांत असून त्यापैकीं निमे नोकरी रण्यास लायक आहेत.)

"सुभाष बाबूंच्यानेतृत्वाखालीं लढलेले हे सैनिक स्वदेशाच्या स्वातंत्र्याच्या हेतूनें प्रेरित होऊनच लढलेले आहेत याबद्दल मला तिळमात्र शंका नाहीं. लष्करी कायद्यान्वयें युद्धकैदी म्हणून त्यांस जर शासन देण्यांत आलें तर हिंदुस्थानला तें लांछनास्पद होईल. हे स्वातंत्र्यवीर मृत्यूमुखीं पडतील किंवा त्यांना जन्मठेप मिळेल म्हणून तें देशाला लांछनास्पद होईल असें नाहीं तर त्याच्या त्या मृत्यूमुळे हिंदुस्थानच्या शरीरांत खोल जखम होईल व ती भरून येण्यास खूप अवधीं लागेल" (सुभाष व त्यांची आझाद हिंद सेना या ग्रंथाला पं. नेहरूंनी लिहिलेली प्रस्तावना. १० ऑ. १९४६)

आझाद हिंद सेनानी शहानवाज यांनी लिहिलेल्या पुस्तकाला पंडीत नेहरूंनी १९४६ मध्यें जी प्रस्तावना लिहिली त्यांतील हा उतारा असून. आम्ही या त्यांच्या शद्बांचा आधार घेऊन त्याना असें विचारूं इच्छितों कीं तुम्हीं काय बोलतां आणि काय करतां येवढेंतरी तुम्हाला कळतें काय ? आझाद हिंद सैनिकांना देशोधडीला लावून हिंदुस्थानच्या शरीरांत जी जखम तुम्ही केली आहे ती बुजण्यास अवधी लागणार नाहीं असें आपलें मत आहे काय ?

११४६ मधली ही प्रस्तावना सोडून १९४७ चा अितिहास पाहूं

आझाद हिंद फौजेंतील बंदी सैनिकाची मुक्तता करण्याची शिफारस करणारा ठराव, १९४७ च्या अेप्रीलमध्यें खान अब्दूल गनीखान यांनी विधीमंडळांत मांडला होता. यावेळीं चर्चेस अुत्तर देतांना पंडीत नेहरूं म्हणाले होते– अिना खटल्यामध्ये आम्ही या सैनिकासाठीं आमच्याकडून होईल तें तें केलें. कां ? तर या प्रश्नाला केवळ तांत्रीक अशा लष्करी बाजूपेक्षाहि अेक वेगळी बाजू आहे असें आम्हाला वाटलें म्हणून.

"हिंदी सैन्यांत अलिकडे दोन भिन्न वृत्ति प्रगट होअूं लागल्या होत्या. यापैकीं सैन्यांतील शिस्तीशीं अेकनिष्ठा राखण्याकडे अेका प्रवृत्तीचा कल. तर दुसरीचा दुसऱ्या अेक प्रकारच्या अेकनिष्ठेकडे. कदाचित ही दुसरी

अकनिष्ठाच अधिक विशाल व आवश्यक असावी. देशाचें भलें कशांत अहे हें जाणून त्याशीं निष्ठा राखण्याकडे या दुसऱ्या प्रवृत्तीचा कल होता."

"अर्थात आझाद हिंद फौजेंतील प्रत्येक व्यक्ति म्हणजे अेक वीर व देशभक्त होता अशी कल्पना करून देण्याचा माझा मतलब नाहीं. यानंतर आझाद हिंद सैनिकांच्या खटल्याचा अितिहास सांगून व सेनापतींनीं दाखविल्या सूज्ञतेची तारीफ करून नेहरू म्हणाले कीं ब्रिटिश व हिंदी दृष्टिकोन यामध्यें मूलभूत फरक आहे हें विसरतां येणार नाहीं. कदाचित हिंदुस्थान पूर्ण स्वतंत्र झाल्यावर हा फरक नाहींसा होअीलही कुणी सांगावें?"

चर्चेचा समारोप करतांना अब्दुल गनीखानहृणाले होते "या आझादनीं हिंद सैनिकांची मुक्तता केल्यानें त्याचा नैतिकदृष्टचा हिंदीं सैन्यावर फार परिणाम होअील असें जर सरसेनापतींचें मत असेल तर पं. नेहरू अधिकारावर आल्यानें त्यापेक्षांही विपरीत परिणाम होण्याचा संभव आहे."

ब्रिटीश व हिंदी दृष्टीकोनांत जो मूलभूत फरक आहे असें नेहरू तेव्हां म्हणाले होते व जो फरक, हिंदूस्थान स्वतंत्र झाल्यावर नाहींसा होअील असा विश्वास त्यानीं व्यक्त केला होता तो फरक नाहींहा तर झाला नाहींच अुलट नेहरूनी आजाद सैनिकांना जी वागणूक दिली त्यामुळे ब्रिटिश दृष्टिकोन त्यानीं मान्य केला हेंच सिद्ध झालें. आझाद हिंद सैनिकांना पुन सैन्यात घेण्याच्या बाबतींत पंतप्रधान नेहरूंनी स्पष्ट नकार दर्शविला ही गोष्ट जगजाहीर आहे. आझाद हिंद सेनेचें संस्थापक नेताजी सुभाषचंद्र बोस हे कॉंग्रेसचे अध्यक्ष व नेहरूंचे सहकारी होते. स्वातंत्र्याच्या संग्रामांत नेंहरूंच्या खांद्याला खांदा लाअून ते लढले होते. जनतेची त्यांच्यावर अलोट भक्ति होती. या गोष्टी लक्षांत घेतल्या तर नेताजींनी हिंदुस्थानच्या वतीनें आझाद हिंद सैनिकांना जी आश्वासनें दिलीं होतीं तीं अक्षरशः पाळण्याची जबाबदारी प्रजासत्ताक हिंदला नाकारतां येअील असें आम्हाला वाटत नाहीं. नेताजी सुभाषचंद्रांचे अुद्गार असे आहेत.

"स्वतःचें रक्त सांडून स्वातंत्र्य मिळविणें आणि स्वतंत्र हिंदुस्थानची कायमची राष्ट्रीयसेना तयार करणें हीं तुमचीं कामें आहेत. मिळविलेले स्वातंत्र्य दीर्घकाल टिकविण्याची जबाबदारी तुमचीच आहे. आमच्या

राष्ट्राच्या संरक्षणाचा पाया आपण अितका भक्कम घालूंया कीं आमचें स्वातंत्र्य हिरावून घेतलें जाण्याची पाळी या नंतरच्या अितिहासांत पुन्हां न येवो सैनिक या नात्यानें निष्ठा, कर्तव्यपालन आणि त्याग या तीन गुणाचे आदर्श समोर ठेअून तुही वागलें पाहिजे. जे सैनिक आपल्या राष्ट्राशीं अेकनिष्ठ राहातात व आत्माहुति देण्याची ज्यांची नेहमींच तयारी असते असे सैनिक अजिक्य असतात."

"तुम्हा सर्वांना मला हें सांगितलें पाहिजे कीं, या युद्धांत जो अनुभव तुम्ही मिळवाल आणि जे विजय संपादन कराल त्यांतूनच आमच्या भावी सेनेची राष्ट्रीय परंपरा निर्माण होअील.

"मित्रानो, मनाला अतिशय अुदात्त वाटणारें कार्य तुही स्वखुषीनें पत्करलें आहे. या कार्यांच्या सांगतेसाठीं कोणताही त्याग जास्त नाहीं. हिदुस्थानच्या राष्ट्रीय प्रतिष्ठेचे तुम्ही आज रखवालदार आहांत आणि हिंदुस्थानच्या आशा आकांक्षा तुमच्या रूपानें आज साकार झाल्या आहेत,

ब्रिटीश साराज्यशाही बरोबर सशस्त्र युद्ध करणारी राष्ट्रीय स्वयंसेवक सेना निर्माण करताना नेताजींनी ह्या सैनिकांवर जी जबाबदारो टांकली होती ती पूर्ण करण्यासाठों आझाद हिंद सैनिकांनी शिकस्तीचे प्रयत्न केले अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत, अन्नाचा आणि शस्त्रसामुग्रीचा कमालीचा तुटवडा असताना रंगूनपासून अिंफालपर्यंत ब्रिटिशांना मागें रेटले आणि अॅटमबॉमचा शोध लागून जपान व जर्मनी यांचा शेवट अितक्या लौकर न होता तर आझाद हिंद सैनिकांना विजअिश्रीनें निश्चित माळ घातली असती.

जॉर्ज वॉशिंटननें अमेरिकेचें स्वातंत्र्य संपादन केलें त्याचें कारण त्याच्या मागे देशनिष्ठ सैना तयार होती म्हणून ! 'अिटाली स्वतंत्र करणाऱ्या गॅरिबॉल्डीच्या मागेंही स्वतंत्र लोक होते. त्या त्या देशाची लष्करी परंपरा त्यांनी निर्माण केली ती आज तागयात जीवंत आहे. अुलट आज स्वतंत्र झालेल्या हिंदुस्थानला अशाप्रकारची तेजस्वी परंपरा सुदैवानें लाभली असतां, देशाचें भलें कशांत आहे हें जाणून त्याशीं निष्ठा राखणाऱ्या या सेनेची प्रवृत्ति अधिक विशाल व आवश्यक आहे हें मान्य करणाऱ्या

पंडित नेहरूंनी, ही तेजस्वी परंपरा अुध्वस्त करून टाकण्यास हातभार लावावा हें किती अुद्वेगजनक आहे! स्वातंत्र्य सेनेत सामील झालेल्या ह्या हिंदी सैनिकांना नेताजी सुभाषचंद्रांनी काय दिलें होतें तें त्यांयाचा शब्दांत देतां येण्यासारखें आहे .

"मी तुम्हाला असें आश्वासन देतों की अंधार असो; प्रकाश असो; आपत्ति असो, क्लेश असोत विजय असो; कोणत्याही परिस्थितींत मी तुमच्याबरोबर राहीन. तूर्त भुक, तहान, यातना, मक्तीची चाल आणि मत्यु याखेरीज मी तुम्हाला कांहीं देअू शकत नाहीं."

नेताजींनी जें देअ केलें तें हें आणि आझाद हिंद सेनेचा अितिहास वाचणारांना आपल्या सैनिकांना नेताजींनी याहुन अधिक कांहीं दिलें असें दाखवितां येणार नाहीं. मग प्रश्न आहे तो हा कीं स्वतंत्रहिंदी प्रजासत्ताकनें आपत्तीचा आणि यातनांचा वांटा सोसणाऱ्या ह्या सैनिकांना स्वातंत्र्यानंतर त्यांच्या हक्कांच्या जागांवरून खालीं ओढावें, पोट जाळण्यासाठीं दारोदार वणवण भटकण्यास त्यांना भाग पाडावें, स्वातंत्र्यवीरांनी हमाल, मजूर, दाखान यासारख्या जागांवर राहून पोट भरतांना पहावें आणि त्याहून दुःखदायक म्हणजे रणांगणावर शूराप्रमाणें देह ठेवणाऱ्या वीरोंच्या घरा-दारांची, त्यांच्यामांगे राष्ट्राकडून मदत न झाल्यानें राखरांगोळी झालेली पहातांना केवळ खैदोद्गार काढावे. अशा लोकांचा आम्ही अेकदाच काय शतशः धिक:र करूं ! ते भारतीय नव्हेत असें आम्ही अेकदांच काय लाखदां म्हणूं ! भारतीय संस्कृति कृतघ्न लोकांसाटीं नाहींच नाहीं.

आझाद सैनिकांविषयींच्या धोरणावर टीका करतांना नवशक्तिकार आपल्या अग्रलेखांत म्हणतात. "पंडित नेहरू यांनी भारतीय विधीमंडळांत आझाद हिंद फौजेबद्दल जें धोरण जाहीर केलें तें लाजीरवाणें आहे. नेहरूंचें व्यक्तित्व अत्यंत समृद्ध आहे. अशा समृद्ध व्यक्तित्वाच्या गृहस्थाच्या हातून असें दरिद्री कृत्य आजवर घडलें नसेल" मुंबअीचे लोकमान्यकार आपल्या अग्रलेखांत लिहीतात "पंतप्रधानांनी जाहीर केलेली योजना अपुरी निराशाजनक, व स्वातंत्र्यवीरांची अुपेक्षा करणारी आहे. ज्यांच्या पराक्रमा-मुळें अखेर स्वातंत्र्य पदरांत पडलें त्यांचेबद्दल स्वतंत्र हिंदुस्थाननें साधी. कृतज्ञता तरी दाखविली हें याभुळें मुळींच सिद्ध होत नाहीं"

दुसऱ्या जागतिक युद्धाला जेव्हां सुरवात झाली तेव्हां सुभाषचंद्र बंदिखान्यांत होतें. पुढें त्यानी अत्यंत साहसानें आणि युक्तीनें ब्रिटिश सी. आय. डी. च्या हातावर तुरी देऊन अनेक संकटाना तोंड देत जर्मनी गांठला. जानेवारी १९४२ मध्यें जर्मनींतील हिंदी कैद्यांची अेक बटालियन अुभी करून ते ब्रिटिशविरोधी युद्धांत भाग घेत होते असे दिसतें. याठिकाणीं असतांनाच बर्लिनमधील जपानी वकीलामार्फत, पूर्व आशियांत आझाद हिंद सेना स्थापन करण्याबाबतची योजना त्यांनी जपानी सरकारला सादर केली आणि तें कार्य सुप्रसिद्ध क्रांतिकारक राशाबिहारी बोस यांनी केलें असें दिसून येतें.

जनरल मोहनसिंगाच्या अटकेनंतर विसर्जन पावलेल्या आय. अेन. अ ची कमांड मेजर जनरल भोंसले यांनी घेतली आणि नेताजी जर्मनीतून येअीपर्यंतच्या कालांत तेच सर्वाधिकारी होते असें अितिहास सांगतो. अितिहासाचीं आणखी कांहीं पानें चाळलीं तर असेंहि दिसून येते कीं, सुभाषचंद्रांच्या आगमनानंतर पूर्व आशियांतील हिंदी जनतेंत असामान्य तेज, स्वात्रंत्र्याकांक्षा संघटणा आणि देशासाठीं सर्वस्वाची आहुती देण्याची आकांक्षा वाढीस लागली होती. त्यांच्या त्यावेळच्या भाषणांचे त्रोटक अहवाल वाचतांना आजहि आमच्या रोमरोमांतून स्फूर्तीचीं कारंजीं वाहूं लागतात मग ज्यावेळीं नेताजींनीं तीं भाषणें केलीं असतील आणिं त्या भाषणांतून स्वातंत्र्याची दिक्षा घेऊन पूर्व आशियांतील आमच्या हिंदी बांधवानीं सर्वस्वाची आहुति देण्याचा ज्यावेळी संकल्प सोडला असेल त्यात्रेळचा तो प्रसंग किती स्फूर्तिदायक असेल ? अितिहासांत यावेळचे जें वर्णन वाचावयाला मिळतें त्यावरून त्यावेळीं फार मोठें वादळ झाल्याचा मुसळधार पाऊस पडल्याचा अुल्लेख सांपडतो. आणि त्या तशा वादळ-पावसांत नेताजींनी आपल्या हिंदी बांधवांना स्वातंत्र्याच्या मंगलमंत्राची पहिली दिक्षा दिली म्हणतात. आम्हाला तर असें वाटते कीं, प्रत्यक्ष गंगाच ह्या स्वातंत्र्यवीरांच्या पदस्पर्शानिं पुनीत होण्यासाठीं स्वर्गांतून खालीं अुतरली असेल. स्वातंत्र्याचा तो मंत्र दशादिशांत तात्काळ पसरविण्याचें पुण्यकार्य करावें म्हणून वारा सोंसाट्यानें वाहूं लागला असेल आणि हें पाहून आकाशाचे अनंत पडदे फाडून विजा भूमितलावर अवतरल्या असतिल. स्वातंत्र्याची ही भावनाच अशी पवित्र

व थोर आहे कीं, त्यासाठीं पंचमहाभूतांनाही स्वताच्या स्थितीचा विसर पडून तीं क्षणभर स्थैर बनावीं. आझाद हिंद वीरांनो तुम्ही धन्य आहांत. तुमच्या ह्या भाग्यासाठीं आम्ही सहस्त्रवर्षं अुपासांनी झिजणें पसंत केलें असतें, अनंत यातनांचा स्विकार केला असता, आणि आमच्या देहांतील रक्त सांडून मिळविलेल्या स्वातंत्र्यानंतर आमच्याच देशबांधवांनी आमची अुपेक्षा केलेली पाहुन कुत्र्याच्या मोलानें मरतांनाही आम्ही खदखदां हंसलों असतों. पण तुमचें हे अलौकिक भाग्य आम्हा करंट्याच्या वाट्यांला कोठुन?

१९४५ सालीं पंतप्रधान नेहरू व त्यांचे सहकारी तुरुंगाच्या बाहेर पडले. त्याचवेळीं त्यांनी ब्रिटिश सरकारला बजावलें होतें कीं, याद राखा, आझाद हिंद सैनिकांच्या केसाला धक्का लागेल तर! कॉंग्रेसनें तेव्हां या सैनिकांचें कोण कौतुक केलें. पंतप्रधानांनी स्वतःच्या अंगावर वीस वर्षांनंतर प्रथमच बॅलिस्टरीचा काळा डगला चढवून लाल किल्ल्यांत प्रवेश केला तेव्हां हिंदी जनतेचीं हृदयें गर्वानें फुगलीं होतीं. पुढें सुप्रसिद्ध कायदेपंडित भुलाभाअी देसाअी यांनी हा खटला लढवला व अखेर त्याश्रमामुळें ते कालवश झाले. पंत प्रधान नेहरु अेक वेळ असें म्हणाले होते कीं, सुभाषचंद्रबोस यांच्या जागीं मी असतो तर त्यांनी जें केलें तेंच मीहि केलें असतें व त्याबद्दल मला अभिमान वाटला असता" पंडित नेहरूंनी जे हे अुद्गार काढले ते, भावनावशतेमुळेंच होय असे आम्हाला वाटतें नपेक्षां सुभाषचंद्रबोस आज पंतप्रधान असते तर ह्या सैनिकांसाठीं त्यांनी जें कांही केलें असतें तें करणें तरी नेंहरूंना अशक्य होतें का? पण नेहरूंची त्याबद्दलची असहाय्यता लक्षांत घेतां, सुभाषचंद्रबोस यांनी जें अचाट कार्य पूर्व आशियांत केलें त्याचा शतांशसुद्धां नेहरुच्या हातून पार पडला असता किंवा काय याबद्दल आम्ही शंकित होतों. केवळ भावनावश माणसाकडून अचाट कृत्यें होत नसतात. त्यासाठीं माणूस खंबीर व जबर आशावादी असावा लागतो. ब्रिटिशनिष्ठ अशा पंचविस वर्षं नोकरी केलेल्या अधिकाऱ्यांवर व सैनिकांवर विश्वास टाकून ब्रिटिशविरोधी लढ्याचीं सुत्रें या अधिकाऱ्याकडे सोंपविणारे सुभाषबाबू व मातृभूमीसाठीं लढलेल्या सुभाषसैनिकांना सैन्यात घेतल्यास सैनिकांच्या मनांवर अनिष्ठ परिणाम होअील अशी सबब सांगणारे

नेहरू यांचीं तुलना अवश्य करावी लागेल. हा 'अनिष्ट शद्ब नेहरुंनी जरी भोघमपणानें वापरला असला तरी त्याचा देशाला अनिष्ट असा परिणाम होअील असाच अर्थ आहे. स्वातंत्र्यासाठीं लढलेल्या सैनिकांना सैन्यांत घेतल्यानें, स्वातंत्र्याचें रक्षण करण्याची जबाबदारी स्विकारणाऱ्या सैनिकांवर त्याचा वाअीट परिणाम होअील हें नेहरूंचें म्हणणें तर्कशुद्ध नाहीं. अुलट आझाद हिंद सैनिकांबद्दल अधिक आपुलकीनें बोलणारे हिंदी सैनिक आम्हाला आढळले आहेत. सुभाषसैनिकांच्या सद्यःस्थितीबद्दल त्यांना खेद वाटतो.

सुभाषसैनिकांना हिंदी सैन्यांतून कमी करतांना त्यांच्यावर कोणते आरोप ठेवण्यांत आले होते ते प्रथम पाहिलें पाहिजे. पहिला आणि महत्वाचा आरोप राजद्रोहाचा. आजचे सगळे मंत्री नं. १ चे राजद्रोही आहेत हें जगप्रसिद्ध आहे. जो राजा आपला नव्हे त्याचा द्रोह केला आणि तेंही देशनिष्ठेसाठीं तर तो गुन्हां नसून स्तुतीस पात्र अशी गोष्ट आहे हें कोणीहि कबूल करील. अमेरिकेंत वसाहत वसवून राहिलेल्या अिंग्रजांनी अिंग्लंडचे व तेथील राजाचें जूं झुगारण्यासाठीं युद्ध पुकारलेंच ना? त्या जॉर्ज वॉशिंग्टनवर आणि त्याच्या सैनिकावर राजद्रोहाचा आरोप ठेवल्याचे आमच्या अैकिवांत नाही. गुलाम देशांतील नागरिकांना ते सैनिक असोत वा कारकून, हमाल, शेतकरी असोत, देशाच्या स्वातंत्र्यासाठीं गुलामीचे पाश तोडण्यासाठी हातांत शस्त्र घेण्याचा बंड करण्याचा हक्क आहे. असेंच आम्ही मानतों.

आंतरराष्ट्रीय कायदा तर असे सांगतो कीं देशाच्या स्वातंत्र्यासाठीं परकी राजविरुद्ध वा राष्ट्राविरूद्ध युद्ध पुकारण्याचा हक्क जनतेला आहे. या ठिकाणीं हा प्रयत्न अेखादा दुसऱ्या व्यक्तीनें केलेला नसून, गुलामराष्ट्राच्या वतीनें स्थापन झालेल्या सरकाच्या, अनेक राष्ट्रांची मान्यता मिळालेल्या सरकारच्या नेतृत्वाखाली हजारों सैनिकांनी केला आहे. अेका प्रस्थापित अशा स्वतंत्र राष्ट्राशीं अेकनिष्ठेची शपथ घेअून युद्ध करणाऱ्या आझादहिंदसैनिकांवर राजद्रोहाचा, किंवा व्यक्तिगत खून व खुनाला अुत्तेजन अशांसारखे आरोप ठेवणें हा निव्वळ ढोंगीपणा आहे आणि तो अिंग्रजानाच शोभतो.

हिंदी स्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या ब्रिटीश व हिंदी सैनिकांना, त्यांच्यावर संगिनी रोंखण्याबैवजीं फुलांच्या माळा घालून त्यांचें स्वागत करायला हवें होतें असे ज्यांना वाटतें त्यांच्या बुद्धिमत्तेची आम्ही कींव करतों. आझादहिंद सैनिकांनी, फुलांच्या माळांअवजीं संगिनी रोखल्या म्हणून त्यांना आज लोक-शाही सरकारनें सैन्यांत घेण्याचे दरवाजे बंद करून घ्यावेत याचा अर्थबोध होण्याअीतके आम्ही पंडीत बनला नाहीं.

हिंदी सैन्यांतून आझादहिंदसेनेंत सामील झालेंल्या १८००० सैनिकांपैकीं किती लोक हिंदीसंघराज्यांत आहेत व त्यांतील कितीजण पोटापाण्याला लागले आहेत तें पाहणें मनोरंजक ठरेल,

	अेकूण	कामावर
के. सी. आय.	१०	२
आय. सी. ओ.	१३	४
अि. सी. ओ.	२२	१३
अे. आय. आर. ओ.	१०५	९५
अितर	१३६७०	४७५ (२५ मुंबअी)
		५०० (दाखान, वर्कर्स)

यांत ४२ डॉक्टरकीच्या व्यवसायांत २१ होमगार्डात कामावर असून अेक हजार सैनिक टेंपररी नोकऱ्या करीत आहेत. मुंबअी प्रांतानें २५ जणांना नोकऱ्या दिल्या असें दिसून येतें. हे आकडे १९४८ चे नेहरूंच्या निवेदना-नंतरचे आहेत.

आझादहिंदसेनेच्या विराट आंदोलनांत सैनिक म्हणून दोन लाख तद्देशीय हिंदी लोकांनी नावें नोंदविली होती. परंतु शस्त्रपुरवठयाच्या अभावी यांतून अवघे २७००० लोक सैन्यांत घेतले गेले. यांत हिंदी सैनिकांची संख्या मिळविली म्हणजे हा आकडा ४५००० होतो. याशिवाय अिन्डियन अिन्डिपेन्डन्स लीग, आझाद हिंद दल, राणी ऑफ् झांशी, बालसेना अि, पुरक संघटणा व त्यांचे सामर्थ्य आम्ही येथें विचारांत घेतलेलें नाहीं. येवढया विशाल संघटनेंतील अग्निदिव्यांतून गेलेल्या हजारों सैनिकांपैकीं जनरल भोंसले यांनी स्वतःच्या प्रयत्नानी १००० लोकांची टेंपररी नोकरीवर

सोय केली. मुंबअी सरकारनें सोय केलेल्या सैनिकांचा आंकडा आज शंभर तरी भरेल कीं काय याबद्दल आम्हाला शंका आहे. पंत प्रधान नेहरूंचा तर असा दावा आहे की, आझादहिंद सैनिकांना निरनिराळ्या सरकारी नोकऱ्या देण्याच्या बाबतींत सरकारनें शिकस्तीचे प्रयत्न केले आहेत. नवीन अुभारावयाच्या सशस्त्र पोलिस दलांत व सैन्याला सहाय्यभूत होअु शकणाऱ्या संरक्षक दलांत त्याना घेण्याचा सरकारनें हणे प्रयत्न केला आहे.

पंतप्रधान पुढें असेंहि म्हणतात कीं, आझाद सैनिकांना सैन्यांत घेण्याच्या बाबतींत अनेक अडचणी आहेत आणि तूर्त तर त्याबाबतीत कांहीं करण्यास मी पूर्ण असमर्थ आहें. शिवाय वस्तुस्थिति अशी आहे कीं तूर्त सैन्यभरतीही चालू नाहीं. याखेरीज ऑगष्ट ११४७ पासून देशात अनेक दुःखद घटना घडल्या असून त्यामुळे सरकारपुढें नवे प्रश्न अुभे राहिले आहेत. आझाद हिंद सैनिकांचा बराच मोठा भाग पाकिस्तानांत असून त्यांपैकीं कांहींजण ज्याला आम्ही पाठिंबा देणार नाहीं अशा खाजगी सैन्यात भाग घेत आहे.' फेब्रुवारी १९४८ मध्यें नेहरूं जें कांही म्हणालें तें हें!

आझाद सैनिकांना नोकऱ्या देण्याच्या बाबतींत आपण शिकस्तीचे प्रयत्न केले असें पं. नेहरू ज्यावेळीं म्हणाले त्यानंतरचे आझाद हिंद सैनिकांचे किती जणांना नोकऱ्या मिळाल्या त्याचे आंकडे वर दिले आहेत. त्यावरून हे शिकस्तीचे प्रयत्न म्हणजे काय त्याचा वाचकांना सहज बोध होओील. आझाद सैनिकांना सैन्यांत घेण्याच्या बाबतींत तूर्त कांहीं करतां येणें शक्य नाहीं असें ते म्हणतात. त्याचा अर्थ पुढें केव्हांतरी तसा विचार सवडीनें करूं असा होतो. ही सवड केव्हां होओील. या गर्भित प्रश्नाला जोडून, नेहरूंचें पुढील विधान घ्यावें लागते. "तूर्त सैन्यभरती चालू नाहीं" हें तें विधान होय.

पण गेले वर्षभर सैन्यभरतीच्या जाहिराती वृत्तपत्रांतून झळकूं लागल्या आहेत त्याचें काय ? सैन्य भरती चालू नाहीं हें विधान आज करतां येण्यासारखें नाहीं हे अुघड आहे. मग किती सुभाष सैनिकांना भरती केलांत ते सांगा असें आम्ही विचारतों. पंत प्रधानांचें शेवटचें वाक्य असें कीं, आझाद सैनिकापैकीं बराच मोठा भाग पाकिस्तानांत आहे आणि त्यांपैकीं

कांहीजण खाजगी सैन्यांत भाग घेत आहेत. पाकिस्तानमधील आझादसैनिकांच श्न तूर्त बाजूला ठेवा असें आमचें त्याना अुत्तर आहे.आणि पाकिस्तानांत असे कितीसे सैनिक आहेत?

२० वरिष्ठ अधिकारी, ५० व्ही. सी, ओ. ४००० सैनिक मिळून ४०७० सुभाषसैनिक पाकिस्तानांत आहेत. हिंदीसंघराज्यांत १० के.सी.आय.ओ. १३ आय,सी.ओ. ३५ अी.सी.ओ. २ अे.आय.आर.ओ. २०० व्ही.सी.ओ. व अीतर १३६७० सैनिक मिळून १३९३० अीतकी संख्या आहे असें सांगतात. आतां आम्हाला सांगा, पाकिस्तानांत असलेलें ४०७० हा मोठा सैन्यविभाग कीं हिंदी संघराज्यांतील १३९३० हा मोठा?

अेकूण वरील सर्व विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो कीं सुभाषसैनिकांच्या बाबतींत जास्तींत जास्त अुपेक्षा आणि अन्याय करण्यांत आला आहे. ह्या दु:खद प्रकरणावर लिहितांना महाराष्ट्रांतील अेक श्रेष्ठतम साहित्तीक व पत्रकार आचार्य अत्रे ११ अप्रील १९४८ च्या नवयुगांत लिहितात--

"नेताजी सुभाषचंद्रबोस यांच्या नेतृत्वाखालीं मातृभूमीच्या स्वातंत्र्यसंग्रामांत ज्यांनी अचाट धैर्याने आणि हिंमतीनें अुडी घेतली त्या अैतिहासिक आझादहिंद फौजेतील शूर आणि देशभक्त वीरांना अन् सैनिकांना परत हिंदी सैन्यामध्यें आपापल्या हुद्यावर घेण्यांत येणांर नाहीं हा हिंदसरकारचे पंतप्रधात नेहरूं यांनी २९ मार्च १९४८ रोजीं स्वमुखानें जाहीर केलेला निर्णय अैकून या देशांतील लक्षावधी स्वातंत्र्यप्रेमी जनतेनें आपल्या माना दु:खानें आणि लज्जेनें खालीं घातल्या असतील! हृदयाला व्याकूळ करणाऱ्या आणि बुद्धीला अगतिक करणाऱ्या अनेक अप्रीय आणि दारुण घटना गेल्या आठ महिन्यांत या देशांत घडल्या असतील. पण त्या सर्व घटनांमध्यें अीतकी संतापकारक आणि लज्जायक घटना दुसरीकोणतीही घडली नसेल. आझाद वीरांना पुन्हां देशाच्या लष्करांत न घेण्याचा निर्णय जाहीर करून हिंद सरकारनें स्वातंत्र्यप्रेमाची आणि देशभक्तीची अत्यंत लाजीवाणी अशी विटंबना केंलेली आहे. आतां यापुढें देशांत जनतेच्या गुणांचे, शौर्याचे आणि त्यागाचें कौतुक होणार. स्वातंत्र्य भक्तांच्या नांवाचे आणि पराक्रमाचे चौघडे अेकसारखे झडत राहणार. देशासाठीं वेंचलेला

प्रत्येक क्षण, केलेली प्रत्येक सेवा, आणि सांडलेला रक्ताचा प्रत्येक थेंब आतां सार्थकीं लागणार, गुणी आणि शूर लोकांच्या बुद्धीला नि कर्तबगारीला नवीं नवीं क्षेत्रें आणि नविन नविन क्षितिजें आतां मोकळीं होणार अशी प्रत्येक हिंदी मनाला आशा वाटूं लागली होती. विशेषत: स्वातंत्र्याच्या झगडयांत ज्यांच्या खांद्याला खांदा लावून आझादवीर धैर्यानें झगडले त्यांच्या हातीं देशाचीं अधिकार सूत्रे आलीं असतांना ते आपल्या जुन्या साथीना आणि सोबत्यांना अशा कृतघ्नतेनें विसरून जातील अशी नुसतीं शंकाही कोणाच्या मनाला शिवली नसेल.

आझादहिंद फौजेतील सैनिकांना पुन्हा लष्करांत कां घेतलें जाणार नाहीं याचीं जीं कारणें नेहरू यांनी निवेदेन केलीं आहेत तीं खरोखर चीड आणणारीं आहेत. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं ज्यांनी अलौकिक त्याग आणि पराक्रम केले त्यांना हिंदी सैन्यामध्यें परत घेतल्यानें सैन्याचा अेकोपा आणि शिस्त बिघडेल याचा अर्थच मुळीं आम्हाला कळत नाहीं. हिंदी सैनिक मनानें अीतकें क्षुद्र आणि मत्सरी असतील यावर आमचा विश्वास बसूं शकत नाहीं

आमच्या हिंद सरकारने अत्यंत अुदार होवून पंधरा हजार आझादहिंद सैनिकांना आणि अधिकाऱ्यांना तीस लक्ष रुपये नुकसान भरपाअी देण्याचें ठरविलें आहे. म्हणजे ब्रिटीश साम्राज्यशाहीविरूद्ध बंड पुकारून मृत्युच्या गुहेत प्रवेश करण्याचा धोका पत्करल्याबद्दल खिशांत २०० रुपयांचा खुर्दा टाकून प्रत्येक आझादवीर सुखासमाधानानें आपापल्या गावीं आतां परत जाअून बसतील. वाहवा, देशासाठीं केलेल्या अुज्वल सेवेबद्दल केवढें हे प्रचंड बक्षीस! स्वातंत्र्यासाठीं केलेल्या त्यागाचा केवढा हा महान गौरव! हिंदुस्थानसारख्या जगामधल्या अत्यंत दरीद्री देशांत गुणी आणि पराक्रमी माणसांला नाहीं तरी यापेक्षां जास्त बक्षिशी काय बरें द्यायची? आझादसैनिकांनी देशासाठीं केलेला लोकोत्तर त्याग अशा रीतीनें सर्वस्वी निष्फळ ठरावा यापेक्षा करूणरसानें ओथंबलेली अधिक हृदय द्रावक आणि विषादकारक शोककथा गेल्या शतकामध्यें या देशांत घडलेली आम्हांला माहित नाहीं .अरेरे! आपल्या मातृभूमीसाठीं सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या निष्ठेला आणि अीमानाला या देशामध्ये हेच बक्षीस मिळावे काय!

गुंफराज प्रकाशन

भाओजीवनजी लेन मुंबअी २

जयमहाराष्ट्र	किं. ६ आ.	क्रान्तिपराग	किं. २ आ.
रडतोंडीचा घाट	,, ४ ,,	सुभाष सैनिकांची जीवन कथा	,, २ ,,

वरील एकमेव विक्रेत्याकडे मागणी करा

गरिबांचें आणि गरिबांसाठीं फक्त अेक पैशांत

अभिनव मराठा

पानें] साप्ताहिक [चार

संपादकः— गं. बा परमेकर

'अभिनव मराठा' नेहमी सत्य असेल तेंच बोलतो, गरिबांची बाजू घेवून झुंजतो; गरिबांच्या, पिडितांच्या, सेवेंत धन्यता मानतो आणि म्हणूनच पैशासाठी तो लाचारी पत्करीत नाहीं. दिवसांतून चार आणे मिळविणारा पाटीवालासुद्धां अेक पैसा देवून अभिनवमराठा खरेदी करतो आणि त्या गरिबाच्या अेक पैशाची किंमत अभिनव मराठयाला फार फार वाटतें. स्थानिक विक्रेत्याला भेटून तुमच्यासाठीं अेक प्रत राखायला त्याला सांगा. नपेक्षां तुमची निराशा होओील. गरिबांपासून श्रीमंतापर्यंत आणि मंत्र्यांपासून पोलीसांपर्यंत प्रत्येकजण न चुकतां अभिनव मराठा वाचतो. सामाजिक कार्याला मदत करणारे आणि गरिबाबद्दल कळकळ असणारेच आपल्या मालाची जाहिरात ह्या वृत्तपत्रांतून करतात. त्याचा मोबदला त्यांना मिळतोच.

फक्त विक्रेत्यांनीच अंकाची मागणी करावी

पत्ताः— गोवर्धन भुवन, खेतवाडी मेन रोड, मुं. ४

प्रकाशकः— गं. बा. परमेकर गोवर्धन भुवन, खेतवाडी मेन रोड, मुं. ४

मुद्रकः—आर्. जो. नाओक महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, खेतवाडी मेनरोड, मुंबअी ४